# त्यांनाही भुयारी मेट्रोची भुरळ!

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या भुयारी मेट्रो ३ चे आकर्षण वाढत आहे. प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकाऱ्यांनाही या मेट्रोची भुरळ पडल्याचे चित्र होते. मसुरी येथे प्रशिक्षण घेणाऱ्या आयएएस अधिकाऱ्यांची एक तुकडीच भारत दर्शन अभ्यास दौऱ्याच्या निमित्ताने मुंबईत आली होती.

या दौऱ्यावर असलेल्या अधिकाऱ्यांनी कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो ३ च्या मार्गातील बीकेसी मेट्रो स्थानकाला भेट दिली. तेथे सुरू असलेल्या तांत्रिक कामासह प्रगतिपथावर असलेल्या उर्वरित कामांचा आढावा घेतला, अशी माहिती कॉर्पोरेशनकडून देण्यात आली.